# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## अधिसभा निवडणूक २०१७

**नोंदणीकृत पदवीधर (Registered graduate) म्हणून नाव नोंदणीबाबत जाहीर सूचना**

सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम १३१ मधील तरतुदीनुसार पदवीधारकांकडून Online/ Offline पद्धतीने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीची प्रक्रिया दिनांक १२/०६/२०१७ ते १३/०७/२०१७ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

नोंदणी प्रक्रियेच्या माहितीकरिता विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावरील Election Portal ला भेट द्यावी.

**(दीपक जुनघरे)**

कुलसचिव (कार्य.) तथा
निवडणूक निर्वाचन अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली (म.रा.)

दुरध्वनी क्रमांक ०७१३२–२२३१०४

**E-Mail** : registrar.gondwanauniversity@gmail.com **Web site** : www.unigug.org


## — पदवीधर नोंदणी जाहीर सुचना —

विद्यापीठाच्या सर्व पदवीधारकांना सुचित करण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाच्या अधिसभेसाठी (सिनेट) पदवीधर मतदारसंघाची निवडणूक सन २०१७ मध्ये होणार आहे. या निवडणूकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १३१ नुसार, नोंदणीकृत पदवीधर यादीत **दिनांक १३ जुलै २०१७ पर्यंत** नाव नोंदणी करावयाची आहे. नांव नोंदणी करू इच्छिणा–या पदवीधारकांनी विहीत नमुन्यात अर्ज करावयाचा आहे.

**नोंदणीकृत पदवीधर यादीत नाव नोंदणी करण्यासाठी अटी आणि शर्ती** :

१) अ) गोंडवाना विद्यापीठाचे पदवीधर यासाठी पात्र राहतील.

ब) कलम १३१(१)(ख) नुसार गोंडवाना विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी पालक विद्यापीठाचे (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) पदवीधर जे गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रात वास्तव्यास आहेत असे पदवीधारक देखील नोंदणी करण्यासाठी पात्र राहतील.

क) पालक विद्यापीठात (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) ज्या विद्यार्थ्यांची परिक्षार्थी म्हणून नोंदणी झाली होती आणि ही नोंदणी गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेच्या १ वर्षापूर्वी झाली असल्यास आणि त्यांना पालक विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आली असल्यास आणि जे गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रात वास्तव्यास आहेत असे पदवीधर देखील नोंदणी करण्यास पात्र राहतील.

२) नोंदणी करण्याची अंतिम तारीख **१३ जुलै, २०१७** आहे. अर्जासह नोंदणी शुल्क रूपये २०/– भरावयाचे आहे.

३) विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावर **निवडणूक दालन (Election Portal)** या लिंकवर **Application Forms** या मथळयाखाली पदवीधर नोंदणी अर्जाचा विहीत नमुना Online नोंदणी करण्यासाठी उपलब्ध आहे. **किंवा** अर्जाचा विहीत नमुना विद्यापीठाच्या अधिकृत नोंदणी कार्यालयात उपलब्ध असून आवश्यक माहिती भरलेला अर्ज त्याच कार्यालयात सादर करावयाचा आहे.

४) अर्जदाराने स्वयंस्वाक्षांकित पदवी प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र (पासपोर्ट), विद्युत वापर देयक, वाहन चालविण्याचा परवाना यापैकी कोणताही एक) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) विवाहित महिला पदवीधारीकेस विवाहानंतरच्या नावाने नोंदणी करावयाची असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र यापैकी कोणताही एक दस्तावेज अर्जासोबत जोडावा लागेल.

६) यापुर्वी विद्यापीठ प्रशासनाने ज्या पदवीधारकांची नोंदणी यादी घोषीत केली आहे आणि त्या यादीमध्ये ज्या पदवीधारकांची नावे समाविष्ट आहेत त्या पदवीधारकांना नमुना अर्ज पुन्हा सादर करणे अनिवार्य आहे. असे असले तरी ही नोंदणी विनाशुल्क करण्यात येईल. सदर यादी विद्यापीठाच्या **www.unigug.org** या संकेतस्थळावर **निवडणूक दालन (Election Portal)** या लिंकवर उपलब्ध असलेल्या **Register of Registered Graduates** या शिर्षकाअंतर्गत पुर्वीच्या विद्याशाखानिहाय प्रकाशित करण्यात आली असून त्यात आपले नांव तपासून घेऊन खात्री करून घ्यावी. **किंवा** विद्यापीठातील निवडणूक कक्षात उपलब्ध यादी व्यक्तीशः तपासावी.

७) विहीत नमुन्यात भरलेले अर्ज आवश्यक दस्तावेज जोडून विद्यापीठाच्या निवडणूक कक्षात दि. १३ जुलै, २०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत

**(टीप : छाननी अंती अंतीम मतदार यादी विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येईल.)**

जा.क्र.गों.वि.ग./निवि/३४२१/२०१७

**दिनांक : १२ जुन, २०१७**

**(दिपक जुनघरे)**

**कुलसचिव (कार्य.) तथा**

**निवडणूक निर्वाचन अधिकारी**

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**